07-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/6/2025 10:28 PM Page 1

निवडक

किनळे माऊली देवस्थानचा ९ रोजी वर्धापनदिन

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ६ : किनळे येथील श्री देवी माऊली सातेरी देवस्थानचा वर्धापनदिन सोहळा शुक्रवार दि. ९ रोजी विविध कार्यक्रमांनी साजरा होणार आहे.
या दिवशी सकाळी ९ वा श्री देवी माऊली चरणी अभिषेक,पुण्याह वाचन लघुरुद्र,प्रधान देवता आवाहन होमहवन बलिदान
पूर्णाहुती,महाआरती,सामुदायिक गाऱ्हाणे, दुपारी १.३० वाजता महाप्रसाद, संध्याकाळी ४ वाजता श्री सत्यनारायण महापूजा, ५.३० वाजता आरती तीर्थप्रसाद व संध्याकाळी ७ वा सुहासिनीचा दीपोत्सव व नंतर महाप्रसाद होणार आहे.तदनंतर रात्री १०.३० वाजता श्री देवी भूमिका दशावतार लोककला नाट्य मंडळ,मळगाव तर्फे ट्रिक सीन्सयुक्त 'भक्त शिरोमणी संत कबीर' नाट्य प्रयोग होणार आहे.तरी भाविक भक्तांनी उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

मांद्रे पुरखेवाडा येथे १० रोजी संगीत 'अमृत मोहिनी'

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ६ : मांद्रे आस्कावाडा (पुरखेवाडा) येथे श्री रवळनाथ तरुण हौशी नाट्य मंडळातर्फे शनिवार दि. १० रोजी रात्री ९.३० वाजता सुनील पुरखे दिग्दर्शित, संगीत 'अमृत मोहिनी' नाटक पूरखेवाडा श्री रवळनाथ मंदिर प्रांगणात होणार आहे.
या नाटकात हरिहर म्हामल,लाडू पुरखें,संकेत प्युरखे, संदीप कामुलकर, प्रेमानंद म्हामल, वेदांत गडेकर, रणजित कलशावकर,कृष्णा पुरखे, गीताली मातोंडकर, प्रगती च्यारी, दुर्वांग कलशावकर, सुनील पुखे, सोहम पुरखे, अथर्व पुरखे व भिकाजी साळगांवकर यांच्या भूमिका आहेत. नाटकाची निर्मिती प्रमुख महेश कोनाडकर, बाबू पूरखे, सह निर्माता सर्वेश बागकर,तीर्थराज म्हामल, अविनाश पुरखे, भिकाजी म्हामल, ज्ञानेश्वर गोडकर, सहदिग्दर्शन सागर केरकर, संगीत दिग्दर्शन शिवानंद दाभोळकर, दत्तराज च्यारी,पार्श्वसंगीत निलेश नाईक, मार्गदर्शक ज्ञानेश्वर पालयेकर, सूत्रधार सद्गुरू गोडकर, नेपथ्य नाटेकर नाट्य भांडार,म्हापसा व ध्वनि सिद्धेश नाईक व बंधू यांची आहे. तरी नाट्य रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष सत्यवान कलशवकर, उपाध्यक्ष हनुमान शेटकर,रवींद्र म्हामल,महेश गोडकर,सचिव सत्यवान मांद्रेकर, उपसचिव संदेश मांद्रेकर, स्वप्नील बागकर, सिद्धारुध म्हामल, खजिनदार तुषार पूरखे, सह खजिनदार सुशांत म्हामल, सखाराम पार्सेकर यानी कळविले आहे.

कोरगाव गावडेवाडा येथे १३ रोजी 'अवघी विठाई माझी'

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ६ : कोरगाव गावडेवाडा येथील श्री स्थळ देवता ब्राह्मण देवतेचा वर्धापनदिन सोहळा मंगळवार दि. १३ मे रोजी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे.
या दिवशी सकाळी धार्मिक विधी,श्री सत्यनारायण
महापूजा,आरती,तीर्थप्रसाद महाप्रसाद संध्या ५ वा स्थानिक कलाकारांचे भजन, रात्री ८ वाजता गावडेवाडा हौशी नाट्य मंडळातर्फे संतकालिन नरेंद्र नाईक लिखित व संदीप कामुलकर दिग्दर्शित संगीत अवघी विठाई माझी' नाटक सादर होणार आहे.
या नाटकात वृषा गावडे, अस्मिता गावडे, ऋतुजा गावडे, विरांगी गावडे, आर्वी गावडे, श्रुती
गावडे, रोशन गावडे, साथी गावडे, शुभ्रा गावडे, सानिया गावडे, रुचिरा गावडे, अपूर्वा गावडे, सोनाली गावडे, सपना गावडे, उज्वला गावडे, प्रिया गावडे यांच्या भूमिका आहेत. या नाटकाचे संगीत दिग्दर्शक राजू बर्वे व दामोदर शेटये, पार्श्वसंगीत द्वारकानाथ गवंडी,प्रकाशयोजना गौरव बर्वे, रंगमंच म्हाळसा देवी मांद्रे व ध्वनि सिद्धेश नाईक यांची आहे. तरी भाविकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

बेताळ देवस्थानचा ९ रोजी वर्धापनदिन

टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. ६ : बेताळवाडा – कवळे येथील श्री बेताळ देवस्थानच्या नूतन मूर्ती प्रतिष्ठापनेचा वर्धापन दिन दि. ९ आणि १० रोजी होणार आहे. ९ मे रोजी सकाळी महारुद्र अभिषेक व अन्य धार्मिक विधी, दुपारी १ वाजता आरती व महाप्रसाद, संध्याकाळी ७ वाजता श्री बेताळ बालकलाकारांतर्फे रंगारंग कार्यक्रम सादर होईल. १० रोजी सकाळी धार्मिक विधी, दुपारी १ वाजता महाआरती व महाप्रसाद होईल. संध्याकाळी ७ वाजता आरती, तीर्थप्रसाज व समारोप सोहळा होईल. त्यानंतर ९.३० अर्पण क्रिएशन मडागाव आणि युवा प्रभात मडगाव प्रस्तुत 'द अदर साईड' हे मराठी नाटक सादर होईल.

रासईतील दत्त मंदिरात उद्या उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ६ : रासई येथील श्री दत्त मंदिरात साप्ताहिक गुरुवार उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त सकाळी 'श्री' पादुकांवर अभिषेक व अन्य धार्मिक विधी संपन्न झाल्या. त्यानंतर संध्याकाळी भजनाचा व हळदी-कुंकू कार्यक्रम झाला तर रात्री आरती, तीर्थप्रसाद व महाप्रसादाने उत्सवाची सांगता करण्यात आली. या उत्सवाचे यजमानपद वेल्यवाडो – करवत, लोटली येथील सुदेश नाईक व परिवार यांनी भूषविले.

मर्दनगडावर ११ रोजी पद्भ्रमण मोहीम

टीम दैनिक हेराल्ड

मडकई, दि. ६ : मर्दन गड आभियान फोंडा, गोवा मराठी अकादमी फोंडा तालुका समिती, अपरांत अस्मिता, विद्या वृद्धी संस्था आणि मर्दन गड स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यामाने रविवार दि. ११ रोजी फोंड्याच्या इतिहासाची साक्ष आललेल्या मर्दन हडावर पदभ्रमण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रविवार दि. ११ रोजी सकाळी ६.३० वाजता शांतीनगर फोंडा येथील कीड्स नेस्ट शाळेकडे एकत्रित होऊन, वनखात्याच्या संकुलातून मर्दनगडावर पदभ्रमण मोहिमेला सुरुवात केली जाईल.
या कार्यक्रमातून मर्दनगडाच्या इतिहासाची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून हा उपक्रम आयोजकांतफर्ए राबवण्यात आला आहे. मोहिमेत इतिहात अभ्यासक सहभागी होऊन माहिती देणार असून इतिहासप्रेमी व विद्यार्थ्यांनी य़ा संधीला लाभ घेण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधण्याचे आवाहन नीलेश नाईक आणि अभित शिरोडकर यांनी केले आहे.

महालक्ष्मी पंचायतन देवस्थानचा १२ पासून पुन:प्राण प्रतिष्ठापना सोहळा

टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. ६ : नानोडा – डिचोली येथील श्री महालक्ष्मी नवीन मूर्तीची पुन:प्राण प्रतिष्ठापना सोहळा सोमवार दि. १२ ते बुधवार दि. १४ रोजीपर्यंत खालील कार्यक्रमनिशी साजरा होणार आहे, त्यानिमित्त सोमवार दि. १२ रोजी सकाळी ९ वाजता यजमानास प्रायश्चित विधी, पुण्याहवाचन, संभारदान, आचार्य परण, गंगा पूजन, जलाधिवास, गणेशयाग, यज्ञमंडप प्रवेश – प्रतिष्ठा, मंगळवार दि. १३ मे रोजी सकाळी ९ वाजता स्थल शुद्धी, मुख्य देवता वास्तू, नवग्रह पूजन, हवन शय्या धीवास व शांतीजप, बुधवार दिनांक १४ मे रोजी सकाळी ९ वाजता स्थल शुद्धी, श्री देवतास मधूपर्क व नंतर १२.११ मी. (दुपारी) या शुभमुहूर्तावर श्री महालक्ष्मी पंचायतनच्या मूर्तीची पुन; प्राण प्रतिष्ठापना नंतर महापूजा, बलिदान, पूर्णाहुती, आरती व सार्वजनिक प्रार्थना, आरती व तीर्थप्रसाद नंतर ठीक २ वा. महाप्रसाद, संध्याकाळी ६ वा. भजनाचा कार्यक्रम होऊन उत्सवाची सांगता होईल. तरी या कार्यक्रमास सर्व महाजनांनी व भक्तांनी आवर्जून उपस्थित राहून उत्सवास शोभा आणावी व श्रींच्या कृपाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे देवस्थान कार्यकारी मंडळातर्फे कळविण्यात आले आहे.

लईराई जत्रोत्सवाची सांगता : भाविकांची अल्प उपस्थिती

टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. ६ : शिरगाव येथील श्री लईराई देवीच्या पाच दिवसीय जत्रोत्सवाच्या सांगतेला मंगळवारी भाविकांची उपस्थिती अत्यल्प होती. शनिवारी घडलेल्या दुर्घटनेनंतर, देवस्थान समिती व प्रशासनाने केलेल्या 'गावात गर्दी टाळा' या आवाहनाला भाविकांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे चित्र संपूर्ण गावात दिसून आले.

शनिवारी घडलेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला होता, तर ७० हून अधिक जण जखमी झाले होते. या पार्श्वभूमीवर, रविवारी झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत जत्रोत्सवाच्या शेवटच्या दिवशी भाविकांनी शिरगावात येऊ नये, असे आवाहन करण्यात आले होते.

मंगळवारी देवदर्शनासाठी गावात आलेली गर्दी अत्यल्प होती. गावातील काही ग्रामस्थ व नातेवाईक यांना वगळता, बाहेरगावाहून आलेल्या भाविकांची संख्या फारच कमी होती. यामुळे संपूर्ण शिरगावात शांततेचे वातावरण निर्माण झाले होते.प्रशासनाने ठिकठिकाणी बॅरिकेड्स उभारून पोलीस बंदोबस्त ठेवला होता. तसेच, बाह्य वाहनांना गावात प्रवेश नाकारण्यात आला होता. सोमवारी रात्री अनेक दुकाने प्रशासनाच्या सूचनेनुसार हटवण्यात आली होती, ज्यामुळे मंदिर परिसर व बाजारपेठ ओस पडल्याचे पाहायला मिळाले.

मंगळवारी रात्री श्री लईराई देवीच्या मंदिरात पूजा-अर्चा करण्यात येऊन जत्रोत्सवाची औपचारिक सांगता करण्यात आली. देवस्थान समितीचे अध्यक्ष दिनानाथ गावकर यांनी भाविकांनी दाखवलेल्या संयमाचे व सहकार्याचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, प्रशासन व समितीने केलेल्या आवाहनाला भाविकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, त्यामुळे शेवटचा दिवस शांततेत पार पडला.शनिवारी झालेल्या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख तर जखमींना १ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. ही मदत १२ दिवसांत वितरित करण्यात येणार आहे. याशिवाय, दुर्घटनेचे नेमके कारण शोधण्यासाठी राज्य सरकारने एक चौकशी समिती स्थापन केली आहे. ही समिती विविध स्तरांवर तपास करत असून लवकरच अहवाल सादर होण्याची अपेक्षा आहे.

शिरगावचा जत्रोत्सव दरवर्षी लाखो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडतो. मात्र यंदा शनिवारी घडलेल्या अपघातामुळे वातावरणात निराशा व हळहळ पसरली. अनेकांनी आपली उपस्थिती ऐन वेळी रद्द केली.देवस्थान समितीने या दुर्घटनेला दुर्दैवी ठरवत पुढील वर्षी अधिक काटेकोर नियोजन करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. सरकारच्या सहकार्याने भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येतील, असे समितीने स्पष्ट केले आहे.

सतत वीज खंडीत : नागरिकांत संताप

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ६ : मानोर-राय परिसरातील रहिवासी आणि व्यावसायिक वीजपुरवठा अघोषितपणे खंडित झाल्यामुळे संतप्त झाले असून, यामुळे त्यांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. प्रचंड उष्ण्याच्या पार्श्वभूमीवर वीज निघाल्याने जनतेचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

संपर्क साधला असता, वीज खंडितीमागे परिसरात नवीन वीजवाहिनी बसवण्याचे काम असल्याचे उघड झाले. मात्र, ही माहिती रहिवाशांना पूर्वसूचना न देता मिळाल्याने असंतोष वाढला आहे. स्थानिक रहिवासी ॲंथनी फर्नांडिस यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले, पायाभूत सुविधांच्या सुधारणांची आम्हाला जाणीव आहे, मात्र कोणतीही पूर्वसूचना न देता वीज खंडित केल्याने आम्ही असहाय झालो आहोत. विशेषत: उन्हाळ्यात अशा परिस्थितीत कुटुंबांसाठी त्रासदायक ठरते. व्यवसायिक सेड्रिक डायस यांनी वीजपुरवठा खंडितीच्या आर्थिक परिणामांकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, आमचे व्यवसाय वीजेवर अवलंबून आहेत. अचानक वीज गेल्यामुळे सेवा ठप्प होतात आणि त्यामुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागते. या पार्श्वभूमीवर, स्थानिकांनी वीज विभागाकडे मागणी केली आहे की, भविष्यात अशा नियोजित कामांपूर्वी वेळेवर आणि प्रभावी संवाद साधावा. त्यांनी स्पष्ट केले की, अशा प्रकारच्या सूचनांमुळे नागरिक योग्य तयारी करू शकतील आणि गैरसोयी टाळता येतील.

जेवणाच्या वादातून भावोजीची निर्घृण हत्या

टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. ६ : कोडार – बेतोडा येथील कुळागरमध्ये राहणाऱ्या दोन झारखंडच्या मजुरांमध्ये सोमवारी रात्री जेवणाच्या क्षुल्लक वादातून घडलेल्या घटनेत एका मजुराने आपल्या भावोजीचा धारदार शस्त्राने गळ्यावर वार करून खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. फोंडा पोलिसांनी आरोपी डेव्हिड टोपो (४०, रा. झारखंड) याला अटक केली असून पुढील तपास सुरु आहे.

मृत व्यक्तीची ओळख दीपक तिर्की (२७, रा. झारखंड) अशी झाली असून तो डेव्हिडचा मेहुणा होता. हे दोघेही गेल्या तीन महिन्यांपासून बेतोडा येथील शेतकरी श्रीकांत उमर्ये यांच्या बागायतीची देखभाल करण्यासाठी तसेच राखण करण्यासाठी कामाला होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी रात्री सुमारे ९.३० वाजता दोघेही दारूच्या नशेत असताना, डेव्हिडने आणलेली कोंबडी दीपकने शिजवून खाण्यास सुरुवात केली. यावरून दोघांमध्ये वाद झाला. डेव्हिडने आधी त्याला जेवण वाढावे, मग खाण्यास सुरुवात करावी, अशी मागणी केली होती. मात्र, दीपकने मी तुझा नोकर नाही असे उत्तर दिल्याने डेव्हिड संतापला आणि त्याने धारदार शस्त्राने दीपकच्या गळ्यावर हल्ला केला. यात दीपकचा जागीच मृत्यू झाला.

हत्या केल्यानंतर डेव्हिड घटनास्थळावरून फरार झाला. परिसरातील स्थानिकांनी मोठा आवाज ऐकून पोलिसांना माहिती दिली. फोंडा पोलिसांची पथक घटनास्थळी दाखल झाली. काही वेळातच डेव्हिड खांडेपार मार्गावरून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना त्याला अटक करण्यात आली.

शेतमालक श्रीकांत उमर्ये यांच्या तक्रारीवरून फोंडा पोलिसांनी डेव्हिडविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम १०३ अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. फोंडा उपविभागीय पोलिस अधिकारी शिवराम वायंगणकर यांनी घटनास्थळाची पाहणी केली. पुढील तपास फोंडा पोलिस करीत आहेत.

सांडपाणी गळतीवर कायमस्वरूपी उपाय करा

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ६ : आर्लेम आणि फातोर्डा परिसरातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात वारंवार होणाऱ्या सांडपाणी गळतीवर तातडीने आणि दीर्घकालीन उपाययोजना राबवण्याची मागणी केली आहे. या गळतीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून, मातीचे प्रदूषण वाढले आहे आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून ही समस्या कायम असून स्थानिकांकडून सातत्याने तक्रारी करण्यात येत होत्या. अलीकडेच स्थानिक आमदार अलेक्सो रेजिनाल्डो लॉरेन्को यांनी सांडपाणी विभागाच्या अधिकाऱ्यांसह आणि बाधित शेतकऱ्यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी केली. या पाहणीनंतर काही तात्पुरत्या उपाययोजना राबवून सांडपाणी गळती थांबवण्यात आली आहे, मात्र शेतकऱ्यांचा असंतोष कायम आहे.

ही केवळ शेतीची समस्या नाही तर सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. तात्पुरत्या उपायांवर आम्हाला समाधान नाही. आम्हाला कायमस्वरूपी आणि ठोस उपाय हवा आहे, अशी भूमिका राय पंचायतीचे सदस्य व शेतकरी जुडस क्वाड्रोस यांनी मांडली. पावसाळ्यात ही समस्या अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

क्वाड्रोस यांनी स्पष्ट केले की भूमिगत सांडपाणी पाइपलाइन जी जुनी व खराब झालेली आहे, तीच या गळतीचे मूळ कारण आहे. फक्त डागडुजी करून हे थांबणार नाही. पाइपलाइन पूर्णपणे बदलण्याची गरज आहे आणि याची नियमित देखरेखही केली पाहिजे, असे ते म्हणाले.

शेतकऱ्यांनी आरोप केला की सार्वजनिक बांधकाम विभाग आणि सीवरेज ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ गोवा लिमिटेड या विभागांकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कारवाई झाली नाही. आमदारांनी हस्तक्षेप केल्यानंतरच हालचाल झाली. परंतु जर दबाव कायम राहिला नाही, तर ही समस्या पुन्हा दुर्लक्षित केली जाईल, अशी भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

या प्रकारामुळे मातीच्या सुपीकतेवर व आसपासच्या जलस्रोतांवरही विपरीत परिणाम होत असल्याची चिंता पर्यावरण कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. ही एक पर्यावरणीय आपत्ती आहे जी घडण्याच्या मार्गावर आहे, असे मत फातोर्डा येथील शेतकरी फ्रान्सिस्को डिसोझा यांनी व्यक्त केले. विषारी सांडपाण्यामुळे आमच्या शेतीची हानी होऊ देणार नाही असेही ते म्हणाले. दरम्यान, शेतकरी लवकरच गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे औपचारिक तक्रार दाखल करण्याच्या तयारीत असून, संबंधित खात्यांवर स्थानिक आमदारांनी सातत्यानं लक्ष ठेवावं, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

आगोंद येथील रिसोर्ट तलावात जीवरक्षक नेमा

▶ संबंधित यंत्रणेने चौकशी करणे आवश्यक

टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. ६ : आगोंद, इगर्जीवाडा येथील एका रिसोर्टमध्ये दक्षिण दिल्ली, येथील पर्यटक सैझी कुटुंबातील ३ वर्षीय बालिका रविवार दि.४ रोजी, पालकांची नजर चुकवून तलावात बुडून निधन झाल्यानंतर गावात हळहळ व्यक्त होत आहे. आगोंद समुद्र किनाऱ्यावर असलेल्या बहुतेक रिसोर्ट मधील तलाव जीव रक्षक वीना आहेत. जर याठिकाणी जीव रक्षक तैनात असते तर त्या ३ वर्षीय बालेकेचे अशाप्रकारे निधन झाले नसते. याठिकाणी असलेले विविध रिसोर्ट सीआरझेड क्षेत्रात असून या प्रकरणाची गांभीर्याने चौकशी करावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

सविस्तर वृत्तानुसार साऊथ दिली येथील एक युवा मुस्लीम तरुण जोडपे आपल्या फातीमा आल्फ्रोज सैझी (३), या चिमुरडीसह आगोंद समुद्र किनाऱ्यावरील एका शेक्समध्ये शनिवारी उतरले होते. रविवारी सकाळी समुद्र किनाऱ्यावर फेरफटका मारून दुपारी इगर्जीवाडा येथील एका रिसोर्टच्या रेस्टॉरंट्स मध्ये जेवण घेण्यासाठी पोहोचले. त्यानंतर आपल्या पालकांची नजर चुकवून चिमुरडी फातीमा रेस्टॉरंट्सपासून थोड्या अंतरावर असलेल्या स्विमिंग पूल जवळ पोहोचली. काही वेळा नंतर जेवण घेण्यास तयार होत असताना फातीमा जवळ नसल्याचे पालकांच्या लक्षात येताच शोधाशोध सुरू झाली. त्यानंतर स्विमिंग पूलात फातिमाचा मृतदेह आढळल्यावर पालकांनी टाहो फोडला. घटनास्थळी पोलीस पोहोचल्यावर कागदी सोपस्कार पूर्ण करून पार्थीव पालकांच्या स्वाधीन केले. त्यानंतर ते आपल्या दिल्ली येथे निवास स्थानी अशी माहिती मिळाली आहे.

ताळगाव आग : निष्काळजी प्रशासनाची झळ नागरिकांना

टीम दैनिक हेराल्ड

ताळगाव, दि. ६ : ताळगाव येथील कामराभाट भागात सोमवारी शेतात लागलेल्या भीषण आगीच्या दुसऱ्या दिवशी, स्थानिकांनी प्रशासनाच्या निष्काळजीपणावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. आगीच्या धुरामुळे अनेक कुटुंबे भयभीत झाली असून, पर्यावरणीय हानीची भीती व्यक्त केली जात आहे.

आगीच्या थेट प्रभावाखाली असलेल्या ज्युलिएट फर्नांडिस यांनी हेराल्ड मिडीयाशी बोलताना आपली व्यथा मांडली. धुरामुळे आमचे संपूर्ण घर भरून गेले होते. शेजाऱ्याच्या सतर्कतेमुळे आम्ही बाहेर पडलो, मात्र गोंधळात मी माझे कुत्रे वाचवू शकले नाही. जरी आग विझवली गेली असली तरी ती मनावर ठसली आहे. आम्ही श्वासावाटे फुफ्फुसात घेतलेल्या धुराचे परिणाम किती दीर्घकालीन असतील, हे सांगता येत नाही, असे त्या म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या, पूर्वीही इथे आगी लागल्या आहेत, मात्र यंदाची आग प्रचंड होती. सुदैवाने माझी मुले घरात नव्हती. आमच्या परिसरातील आंबा, चिकू, फणस, नारळ अशी अनेक झाडे जळून खाक झाली आहेत. आम्हाला घरापर्यंत पोहोचण्याचा मार्गही सुलभ नाही, त्यामुळे ना रुग्णवाहिका येऊ शकते, ना अग्निशमन दल. प्रेमाने लावलेली झाडे जळताना पाहणे यातना देणारे आहे.

स्थानिक रहिवासी फ्रान्सिस कोएल्हो यांनी आगीच्या मूळ कारणांवर प्रकाश टाकला. ताळगावमधील शेती हळूहळू संपत चालली आहे. शेतांचे रूपांतर केले जातंय आणि माजी आमदारांनी याकडे दुर्लक्ष केले आहे. बेकायदेशीर जमीन भरणेही खुलेआम चालू आहे. आमदारांनी इच्छाशक्ती दाखवली असती तर हे थांबवता आलं असतं, असे त्यांनी सांगितले.कोएल्हो यांनी पुढे म्हटले की दरवर्षी येथे कोणीतरी शेतांना आग लावतो. लोक दरवाजे-खिडक्या बंद करून बसतात. पण आमदारांना या गोष्टींचं काही घेणं-देणं नाही. तळेगावच्या शेतीबाबत कोणीच गंभीर नाही.

सामाजिक कार्यकर्ते मारियानो फेराव यांनी स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली. हा भाग काँक्रीटच्या जंगलात परिवर्तित होत आहे. एकीकडे नैसर्गिक हरित पट्टे नष्ट होत आहेत, तर दुसरीकडे कृत्रिम फुफ्फुसे तयार करण्याची भाषा सुरू आहे. हे काँक्रीटीकरण स्थानिकांसाठी नाही, बाहेरून येणाऱ्या श्रीमंतांसाठी आहे.

परिसरातील आणखी एका रहिवाशाने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, धूर इतका गडद होता की आम्हाला आमचं वाहन देखील सापडलं नाही. आधी धुराचा स्त्रोत समजला नाही, पण लक्षात येताच आम्ही धावत खाली आलो. गेल्या वर्षीदेखील इथे आग लागली होती, पण तीव्रता कमी होती. यावेळी वाऱ्यामुळे आग वेगाने पसरली.

स्थानिक रहिवासी सिसिल रॉड्रिग्ज यांनी या घटनेच्या पार्श्वभूमीवर पंचायतीच्या सचिवांना निवेदन दिले आहे. एप्रिल-मे महिन्यांमध्ये शेतांमध्ये सातत्याने आग लागते. या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन करावी. आम्ही आमचा सहभाग द्यायला तयार आहोत, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

दरम्यान, वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली असून, त्यांनी जळालेल्या भागातून पाच मृत कासवे आणि दोन साप बाहेर काढले. वनमंत्री विश्वजित राणे यांनी सांगितले की, विभागाच्या टीमला घटनास्थळी पाठवले असून नुकसानीचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कारवाई केली जाईल.